# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com | पुणे, पिंपरी-चिंचवड | गुरुवार, दि. 6 मार्च 2025 | पान- 1


# आता आंद्रा धरणातून थेट जलवाहिनीद्वारे पाणी

## जलवाहिनी, जॅकवेल, पंप हाऊस, सब स्टेशन आदी कामांना मान्यता : पाटबंधारे विभागाकडे प्रस्ताव

**पिंपरी | प्रतिनिधी**

आंद्रा धरणातून शहरासाठी दररोज शंभर दशलक्ष लिटर (एमएलडी) पाण्याचा कोटा मंजूर असतानाही पुरेसे पाणी मिळत नसल्यामुळे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने धरणापासून थेट जलवाहिनीद्वारे पाणी आणण्याचे नियोजन केले आहे. जलवाहिनी, जॅकवेल, पंप हाऊस, सब स्टेशन आदी कामांना मान्यता देण्यासाठी महापालिकेने पाटबंधारे विभागाकडे प्रस्ताव सादर केला आहे.



पिंपरी-चिंचवड शहराला मागील साडेपाच वर्षांपासून एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. शहराची लोकसंख्या वाढत असताना पाण्याची मागणीही सातत्याने वाढत आहे. त्यामुळेच भामा आसखेड धरणातून १६७ आणि आंद्रा धरणातून शंभर असे २६७ एमएलडी पाणी शहरासाठी राखीव करण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात आंद्रा धरणातून पाणी शहराला मिळण्यास सुरुवात झाली आहे. या धरणातून इंद्रायणी नदीत पाणी सोडले जाते. ते महापालिका निघोजे येथील बंधाऱ्यावरून उचलत आहे. मात्र, धरणातून १५० एमएलडी पाणी सोडल्यानंतर निघोजे बंधाऱ्याला शंभर एमएलडी पाणी येते. वाटेत पाण्याची मोठ्या प्रमाणात गळती होत आहे. त्यामुळे आंद्रातून शंभर एमएलडी पाणी मंजूर असतानाही सद्य:स्थितीत ५० ते ६० एमएलडीच पाणी शहराला मिळत आहे.

आंद्रा धरणातून थेट जलवाहिनीद्वारे पाणी आणण्यासाठी महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने हालचाली सुरू केल्या आहेत. यासाठी आंद्रा धरण ते नवलाख उंब्रे येथील ब्रेक प्रेशर टँक या साडेनऊ किलोमीटर अंतराचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. जलवाहिनीच्या मार्गावर एमआयडीसी, शेतकरी, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वन विभागाची जागा आहे. जलवाहिनी टाकण्यासाठी परवानगी, जागा ताब्यात मिळावी, यासाठी महापालिकेने पाटबंधारे विभागाकडे प्रस्ताव सादर केला आहे. तसेच आंद्रा धरणाच्या वरील बाजूला मौजे शिरे येथे जॅकवेल, पंप हाऊस, सब स्टेशन अंतर्गत रस्ते यासाठी एक एकर जागा घेण्याचे महापालिकेने नियोजन केले आहे.

### 208 कोटींचा खर्च

» इंद्रायणी नदीत पाणी सोडून निघोजे बंधाऱ्यातून महापालिका पाणी उचलते. वाटेत मोठ्या प्रमाणात पाणीगळती, जलप्रदूषण असल्याने ठरलेल्या कोट्याप्रमाणे शहराला पाणी मिळत नाही. त्यामुळे आंद्रा धरणापासून जलवाहिनीद्वारे पाणी आणल्यास पाणी शुद्धीकरणावरील होणाऱ्या खर्चात कपात होईल. नागरिकांना अधिक शुद्ध पाणी मिळेल. या प्रकल्पावर २०८ कोटींचा खर्च होण्याचा अंदाज आहे.

“ आंद्रा धरणातून थेट जलवाहिनीद्वारे पाणी आणण्यासाठी पाटबंधारे विभागाला प्रस्ताव सादर केला आहे. पाटबंधारे विभाग सकारात्मक असून, त्यांच्या मान्यतेनंतर प्रत्यक्ष निविदा प्रक्रियेला सुरुवात केली जाईल.

**- अजय सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग.**

---

# महापालिकेच्या प्रशासकीय कामकाजात ‘एआय’चा वापर

## पिंपरी-चिंचवड महापालिका स्थापनेस 2032 मध्ये 50 वर्षे पूर्ण : त्यानिमित्ताने व्हिजन@ 50 शहर धोरण

**पिंपरी | प्रतिनिधी**

‘आजचे जग वेगाने आधुनिक तंत्रज्ञानयुक्त सेवा सुविधांमध्ये परिवर्तीत होत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) प्रभावी वापर सर्व स्तरावर केला जात आहे. अशावेळी महापालिकेच्या प्रशासकीय कामकाजातही ‘एआय’तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक आहे, असे मत पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी व्यक्त केले.

पिंपरी-चिंचवड महापालिका स्थापनेस २०३२ मध्ये ५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने महापालिकेने व्हिजन@ ५० शहर धोरण हा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत विविध विभागांच्या प्रमुखांचा सहभाग असलेली दोन दिवसीय कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेत व्हिजन@ ५० उपक्रमाबद्दल आयोजित चर्चेत ते बोलत होते. अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे, विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे,



आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यावेळी उपस्थित होते.

शहर परिवर्तन कार्यालयासाठी नियुक्त पॅलेडियम संस्थेच्या तज्ज्ञ मार्गदर्शकांनी गेल्या दोन महिन्यांपासून व्हिजन @ ५० उपक्रमाअंतर्गत विविध भागधारकांसोबत केलेल्या गटचर्चांमधून आलेल्या प्राथमिक निरीक्षणांवर चर्चा करण्यात आली.

आयुक्त शेखर सिंह म्हणाले, ‘शहराची संस्कृती जपत कला, संस्कृती, क्रीडा क्षेत्रात शहराचा सर्वार्थाने विकास साधण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे. ही संपूर्ण प्रक्रिया पार पाडत असताना शहरातील सर्व घटकांचे मत विचारात घेण्यासाठी महापालिकेच्या वतीने चर्चासत्रे आणि संवादसत्रांचे आयोजन करण्यात येत आहे. याद्वारे प्राप्त सूचना आणि माहितीचा एकत्रित अंतर्भाव करून महापालिका स्वतंत्र आराखडा तयार करणार आहे. शासन तसेच लोकप्रतिनिधींच्या सूचनांचा देखील यामध्ये अंतर्भाव असणार आहे. त्यानुसार आवश्यक धोरणे आखून त्याप्रमाणे नियोजनबद्ध अंमलबजावणी करण्यासाठी महापालिका कार्यवाही करणार आहे. त्यातून नव्याने विविध उपक्रम आणि योजना विकसित केल्या जाणार आहेत’.

# पुणेकरांना मिळणार मीटरने पाणी

## समान पाणीपुरवठा योजनेचे काम 75 टक्के पूर्ण : आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांची माहिती



**पुणे | प्रतिनिधी**

'शहरातील नागरिकांना एकसारखे आणि पुरेशा दाबाने पाणी मिळावे, यासाठी महापालिकेने हाती घेतलेल्या 'समान पाणीपुरवठा योजनेचे' काम ७५ टक्के पूर्ण झाले असून, डिसेंबर २०२५ अखेरपर्यंत उर्वरित सर्व कामे पूर्ण केली जातील. त्यामुळे मार्च २०२६ पासून पुणेकरांना मीटरने पाण्याचे देयक देण्यास सुरुवात होईल,' असे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी स्पष्ट केले.

महापालिका आयुक्त डॉ. भोसले यांनी मंगळवारी २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे १२ हजार ६१८ कोटी रुपयांचे अंदाजपत्रक स्थायी समितीला सादर केले. यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत भोसले यांनी विविध विषयांची माहिती दिली. ते म्हणाले, 'शहरातील सर्व भागातील नागरिकांना पुरेशा दाबाने एकसमान पाणी मिळावे, यासाठी महापालिकेने समान पाणीपुरवठा योजना राबविण्यास सुरुवात केली आहे. या योजनेचे काम ७५ टक्के पूर्ण झाले असून, पुढील १० वर्षे या योजनेच्या देखभाल दुरुस्तीसाठी महापालिकेच्या वतीने निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

या योजनेसाठी २ हजार ४८ कोटी रुपयांच्या निविदा काढण्यात आल्या होत्या. त्यापैकी १ हजार ४७१ कोटी रुपये खर्च झाला आहे. उर्वरित सर्व कामे डिसेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.'

'या योजनेच्या माध्यमातून शहरातील काही भागांमध्ये पाण्यासाठी मीटर बसविण्याची कामे प्रगतिपथावर आहेत. या योजनेमध्ये १४१ पाणीपुरवठा झोन असून, त्यापैकी ६२ झोनचे काम पूर्ण झाले आहे. जानेवारी २०२६ पर्यंत या संपूर्ण योजनेचे काम पूर्ण होईल. त्यानंतर मार्च २०२६ पासून मीटरने पाण्याची देयके महापालिकेच्या वतीने पुणेकरांना दिली जातील,' असे आयुक्त डॉ. भोसले यांनी स्पष्ट केले.

'ही योजना राबविताना देखभाल दुरुस्तीमध्ये शहरातील ज्या भागात पाण्याची गळती होत आहे, ते शोधण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. रोबो मशीनद्वारे जलवाहिनीची तपासणी करून गळती, बेकायदा नळजोड शोधण्याचे प्रात्यक्षिक महापालिकेच्या वतीने घेण्यात आले आहे. २०२५-२६ च्या अंदाजपत्रकात या कामासाठी ५० लाख रुपयांची तरतूददेखील करण्यात आली आहे.'

समाविष्ट गावांमध्येही समान पाणी योजना राबविणार महापालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या गावातील नागरिकांना स्वच्छ पाणीपुरवठा करण्यासाठी जलशुद्धीकरण केंद्र बांधण्याचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. तसेच, या गावांमध्येदेखील समान पाणी पुरवठा योजना राबविण्यासाठी प्रयत्नशील असून लवकरच त्याचे कामदेखील सुरू होणार आहे. जलशुद्धीकरण केंद्र उभारण्यासाठी राज्य सरकारने निधी दिल्यास या गावांमध्ये टाक्यांची कामेदेखील तातडीने सुरू केली जातील, असे महापालिका आयुक्त डॉ. भोसले यांनी स्पष्ट केले.

### पाणीपट्टी थकबाकी 727 कोटींवर

» शहरातील ज्या नागरिकांना मीटरने पाणी दिले जाते, त्यांच्याकडून जानेवारी २०२५ अखेरपर्यंत १०२ कोटी रुपये जमा झाले. ३१ जानेवारी अखेरपर्यंत शहरात ४७ हजार ७० इतके नळजोडची संख्या आहे. तर ७२७ कोटी १६ लाख रुपयांची थकबाकी आहे. दुबार पाणीपट्टी, नादुरुस्ती मीटर, नळजोड बंद, घोषित झोपडपट्टीमधील पाणीपट्टी अशा विविध कारणांमुळे मीटर पाणीपट्टीची थकबाकी आहे. ही थकबाकी वसुलीसाठी प्रयत्न केले जात आहेत. २०२३-२४ या आर्थिक वर्षात तीन वेळा लोक अदालत भरविली. त्याद्वारे एक कोटी १३ लाख रुपये इतकी थकबाकी वसूल करण्यात आली.

# पीएमपी प्रवाशांचा लवकरच आरामदायी प्रवास

## येत्या तीन महिन्यांत प्रदूषणरहित सीएनजीवरील 600 बस घेण्याचा निर्णय



**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपी) येत्या तीन महिन्यांत प्रदूषणरहित सीएनजीवरील ६०० बस घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यापैकी सरकारी-खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावरील ४०० बस पुढच्या महिन्यात (एप्रिल) पीएमपीच्या ताफ्यात दाखल होणार आहेत, तर स्वमालकीच्या २०० बस जून महिनाअखेरपर्यंत प्राप्त होतील, अशी माहिती पीएमपी प्रशासनाकडून देण्यात आली. त्यामुळे प्रवाशांना मोडक्यातोडक्या बस ऐवजी पर्यावरणपूरक आणि आरामदायी वातानुकुलीत बसमधून प्रवास करता येणार आहे.

पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पीएमआरएडीच्या हद्दीत पीएमपीकडून प्रवासी सेवा दिली जाते. त्यामध्ये ठेकेदारांमार्फत चालविल्या जाणाऱ्या बसचे आयुर्मान संपुष्टात आले आहे. त्यामुळे आत्तापर्यंत २५० पेक्षा जास्त बस ताफ्यातून कमी करण्यात आल्या आहेत. परिणामी, पीएमपीच्या ताफ्यातील बसची संख्या कमी झाली असून, स्वमालकीच्या १२ वर्षे जुन्या बस अद्यापही नाईलाजास्तव चालविल्या जात आहेत. त्यामुळे ताफ्यातील संख्या एक हजार ६५४पर्यंत आली आहे. त्यामुळे मार्गावर धावणाऱ्या बसच्या संख्येतही घट झाली आहे. याचा फटका प्रवाशांच्या सेवेवर होण्यास सुरुवात झाली. त्यानुसार गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये झालेल्या पीएमपीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत २०० स्वमालकीच्या आणि ४०० पीपीपी तत्त्वावरील बस घेण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार पीपीपी तत्त्वावरील ४०० सीएनजी बसच्या खरेदीची प्रक्रिया नुकतीच पूर्ण झाली आहे, तर दुसरीकडे स्वमालकीच्या २०० बसच्या खरेदीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

> "पीएमपीच्या ताफ्यातील स्वमालकीच्या आणि कंत्राटी पद्धतीवरील बसचे आयुर्मान संपुष्टात आले असून, अनेक बसची कालमर्यादा १२ वर्षांपेक्षा जास्त झाली आहे. नवीन बस ताफ्यात घेण्यासाठी कार्यवाही सुरू होती. तीन महिन्यांत पर्यावरणपूरक, वातानुकुलित सीएनजी आधारित ६०० बस ताफ्यात दाखल होणार असून, पुढच्या महिन्यात पीपीपी तत्त्वावरील ४०० बस ताफ्यात दाखल होतील.
>
> **- दीपा मुधोळ मुंडे, व्यवस्थापकीय संचालक तथा अध्यक्ष, पीएमपीएमएल.**

# भामा आसखेडच्या कामात खर्चाचा पेच

## इंदोरी ते वाकीतर्फे वाडा या मार्गावर जलवाहिनीला अडथळा, 300 के.व्ही. उच्चदाब वाहिनी स्थलांतरासाठी तीन कोटींचा वाढीव खर्च

**पिंपरी | प्रतिनिधी**

भामा आसखेड धरणातून पाणीपुरवठा करण्यासाठी हाती घेतलेल्या जलवाहिनीचे काम संथ गतीने सुरू आहे. हे काम करीत असताना जलवाहिनी टाकण्याच्या कामाला अडथळा ठरणारे इंदोरी ते वाकीतर्फे वाडा या मार्गावरील ३०० के.व्ही. उच्च दाब वीजखांब हलविण्यासाठी महापालिकेच्या विद्युत विभागाने ३ कोटी ४ लाख ६३ हजार ४४८ रुपयांची निविदा प्रसिद्ध केली आहे.

भामा आसखेड धरणातून पाणीपुरवठा करण्यासाठी हाती घेतलेल्या जलवाहिनीचे काम संथ गतीने सुरू आहे. हे काम करीत असताना जलवाहिनी टाकण्याच्या कामाला अडथळा ठरणारे इंदोरी ते वाकीतर्फे वाडा या मार्गावरील ३०० के.व्ही. उच्च दाब वीजखांब हलविण्यासाठी महापालिकेच्या विद्युत विभागाने ३ कोटी ४ लाख ६३ हजार ४४८ रुपयांची निविदा प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे एकीकडे हे काम संथ गतीने सुरू असतानाच या प्रकल्पाच्या खर्चात विविध कारणांमुळे वाढ होत असल्याचे चित्र आहे.

पिंपरी-चिंचवड शहरासाठी भामा आसखेड धरणात १६७ एमएलडी पाण्याचा कोटा राखीव करण्यात आला आहे. धरणातून थेट जलवाहिनीद्वारे पाणी आणण्यासाठी महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने २०२० मध्ये निविदा प्रक्रिया राबवून जलवाहिनी टाकण्याचे काम 'ऑफशोअर इंडिया लि.' या ठेकेदाराला दिले. या कामाची चार वर्षांची मुदत संपली, तरी हे काम अपूर्णच आहे.

या जलवाहिनीचे काम ५० टक्केच पूर्ण झाले आहे. नवलाख उंबरेपासून चिखलीतील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत जलवाहिनी टाकण्यात येत आहे. जलवाहिनीचे संपूर्ण काम १६२ कोटी रुपयांचे आहे. काम सुरू करण्याचा आदेश १५ डिसेंबर २०२० रोजी दिला होता. कामाची मुदत १५ डिसेंबर २०२४ अशी चार वर्षांची होती. मात्र, या मुदतीत १९ किलोमीटरपैकी केवळ नऊ किलोमीटर जलवाहिनीचे काम पूर्ण झाले आहे.

दरम्यान, आंद्रा धरणातील पाणी नवलाख उंबरे येथून एकाच जलवाहिनीतून चिखलीतील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत आणण्यात येणार आहे. या मार्गात साडेसात किलोमीटर जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. मात्र, या कामाला अद्याप सुरुवात झालेली नाही.



### खांब हटविण्यासाठी वर्षभराची मुदत

» इंदोरी ते वाकीतर्फे वाडा या मार्गावर जलवाहिनी टाकण्यास अडथळा ठरणारे ३०० वीजखांब हलविण्यासाठी 'महावितरण'च्या परवानगीनंतर शुल्क भरून हे काम हाती घेतले जाणार आहे. त्यासाठी तीन कोटी चार लाख ६३ हजार ४४८ रुपयांची निविदा महापालिकेच्या विद्युत विभागाने प्रसिद्ध केली आहे.

### जलवाहिनीचे चार वर्षात 50 टक्के काम

» महापालिकेच्या भामा-आसखेड जलवाहिनीचा ठेकेदार व पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांची कामाच्या गेल्या महिन्यात आढावा बैठक घेतली. यामध्ये झालेल्या कामाचा आढावा घेतला. भामा आसखेड धरणातून पाणीपुरवठा करण्यासाठी हाती घेतलेल्या जलवाहिनीचे काम संथ गतीने सुरू आहे. या कामाची चार वर्षांची मुदत संपली, तरी काम अपूर्णच आहे. या जलवाहिनीचे काम ५० टक्के टक्के झाले आहे. उर्वरित काम करण्यासाठी संबंधित ठेकेदाराला एक वर्षांची मुदतवाढ देण्यात आली आहे.

---

# गाथा ई-बुक स्वरूपात आणणार; उदय सामंत यांची घोषणा

## आळंदी देवस्थानच्या जागेतील विकास आराखड्यासाठी देखील शासन निधी देणार असल्याची माहिती राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी दिली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या अभंग गाथेतील सर्व अभंग महाराष्ट्र शासन ई बुक, ऑडिओ स्वरूपात आणणार असून संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदी देवस्थानच्या जागेतील विकास आराखड्यासाठी देखील शासन निधी देणार असल्याची माहिती राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आळंदी येथे दिली.

येत्या काळात राज्य शासनातर्फे त्रिदिनी कीर्तन महोत्सव देखील आळंदीत राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या अभंग गाथेतील सर्व अभंग महाराष्ट्र शासन ई बुक, ऑडिओ स्वरूपात आणणार असून संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी, आळंदी देवस्थानच्या जागेतील विकास आराखड्यासाठी देखील शासन निधी देणार असल्याची माहिती राज्याचे उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आळंदी येथे दिली.

संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी व श्री ज्ञानेश्वरी परिवाराकडून विद्यार्थ्यांच्या मूल्यसंवर्धनासाठीची 'ओळख श्री ज्ञानेश्वरीची' व 'परिचय भागवत धर्माचा' या दोन पुस्तकांची निर्मिती करण्यात आली. या पुस्तकांचे प्रकाशन मंत्री सामंत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते

ओळख ज्ञानेश्वरीच्या उपक्रमाचे कौतुक करत त्यांनी सदर उपक्रम हा महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागातील मूल्य शिक्षणात घेण्याबाबत विचाराधीन असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच येत्या काळात राज्य शासनातर्फे त्रिदिनी कीर्तन महोत्सव देखील आळंदीत राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त योगी निरंजनाथ, विश्वस्त ॲड.राजेंद्र उमाप, डॉ.भावार्थ देखने, माजी विश्वस्त अभय टिळक, डॉ.नारायण महाराज जाधव, नरहरी चौधरी, प्रमुख व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर, संत ज्ञानेश्वर महाराज चरित्र समितीचे अध्यक्ष प्रकाश काळे, ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुरेश वडगावकर, सचिव अजित वडगावकर, ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष ॲड.विष्णू तापकीर, सुभाष गेठे, भागवत साळुंके, शेवाळे महाराज, उमेश बागडे आदी मान्यवर उपस्थित होते.



> हा कार्यक्रम माझ्या दृष्टीने फार मोठा कार्यक्रम असून आपण ज्या ग्रंथाच प्रकाशन करतो ते ग्रंथ खूप ताकतीचे ग्रंथ आहेत. त्याच प्रकाशन मी करतोय हे माझे परमभाग्य आहे. याच मला समाधान आहे अशी भावना यावेळी व्यक्त केली. खऱ्या अर्थाने महाराष्ट्राची संस्कृती पाहायची असेल तर संतांच्या भूमीत आले पाहिजे. माझ्या आयुष्याच्या दृष्टीने संत ज्ञानेश्वरांच्या भूमीतील कार्यक्रम अतिशय भाग्याचा क्षण आहे. हे पुस्तक प्रकाशन करताना पुस्तक वाचली पाहिजेत. संत साहित्य म्हणजे अभिजात भाषा आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांची भाषा ही फक्त अभिजात भाषा नाही तर जगातील सर्व भाषांना मागे टाकणारी भाषा आहे.
>
> - डॉ. उदय सामंत, उद्योग मंत्री

# राजगुरूनगरवासीयांना दिलासा, करवाढ नाही : 23 लाखांचा शिलकीचा अर्थसंकल्प

## सणसर जोड कालव्याला आराखड्यात तरतूद केल्याप्रमाणे पाणी सोडण्यात यावे, ते 22 गावांना शेती सिंचनासाठी देण्यात यावे

**पुणे | प्रतिनिधी**

राजगुरूनगर नगरपरिषदेचा 2025-26 या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकीय अर्थसंकल्पाला प्रशासकीय सभेत मान्यता देण्यात आली. अर्थसंकल्पात कोणतीही करवाढ करण्यात आली नसून 23 लाख रुपये शिलकीचा अर्थसंकल्प असल्याची माहिती राजगुरूनगर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे यांनी दिली.

राजगुरुनगरला नव्याने नगरपरिषद स्थापन झाल्यानंतरचा हा 11 वा अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पात कोणतीही करवाढ करण्यात आली नाही. राजगुरूनगर नगरपरिषदेचा 23 लाख रुपये शिलकीचा अर्थसंकल्प आहे. विकासाच्या दृष्टीने व जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष न करता मार्गदर्शक तत्वानुसार प्रशासनाने हे अंदाजपत्रक बनविले आहे.

नगरपरिषदेचे आर्थिक बाजू सक्षम राहण्यासाठी नवीन आर्थिक वर्षात करवसुलीला प्राधान्य देण्यात आले आहे. पाणी योजना, शहरातील भुयारी गटार योजना व शहरातील अनेक भागामध्ये रस्ते मजबुतीकरणाला प्राधान्य देण्यात आले आहे. मागील वर्षी (सन 2024-25 ) ला 19 लाख रुपये शिलकीचाअर्थसंकल्प सादर करण्यात आला होता.

यावेळी मात्र मर्यादित उत्पन्न व खर्च यात समन्वय साधण्याचा प्रयत्न या अर्थसंकल्पात करण्यात आला आहे. नको असलेल्या खर्चाला काटछाट देण्यात आली आहे. महिला व बालकल्याण दुर्बल घटकातील नागरिक तसेच दिव्यांग नागरिक याकरिता प्रत्येकी 5 टक्के तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.




### अर्थसंकल्पीय दृष्टीकोन रुपयांत

» महसूल जमा : 17.64 कोटी, » भांडवली जमा : 53.49 कोटी, » एकूण अपेक्षित जमा : 71.13 कोटी
» महसुली खर्च : 16.31 कोटी, » भांडवली खर्च : 54.59 कोटी, » आरंभीची शिल्लक : 23 लाख

### महत्त्वाच्या काही तरतुदी रुपयांत

- » नमामि चंद्रभागा अभियान अंतर्गत भीमानदी स्वच्छता व संवर्धन :2 कोटी
- » कचरा उचलणे व प्रक्रिया : 1 कोटी
- » नळ कनेक्शन मीटर : 10 लाख
- » रस्ते बांधकाम : 10 कोटी
- » पाणीपुरवठा : 1 कोटी
- » शहरांतर्गत हायमास्ट बसविणे : 50 लाख
- » न. पा. इमारत फर्निचर : 70 लाख
- » दिवे आणि विद्युत खांब : 55 लाख
- » पाणीपट्टी व वीज : 1 कोटी 50 लाख
- » अधिसूचित विशिष्ट नागरी सुविधा पुरवणे : 5 कोटी

### उत्पन्नाच्या प्रमुख बाबी रुपयांत

- » संकलित कर : 5.50 कोटी
- » पाणीपट्टी : 2.64 कोटी,
- » बांधकाम विकास शुल्क :2.50 कोटी,
- » नगरपालिका सहाय्यक अनुदान : 1 .18 कोटी

> यावर्षीचा रिऍलिस्टिक असा अर्थसंकल्प आहे. मर्यादित उत्पन्न व खर्च साधण्याचा प्रयत्न केला आहे. नको असलेल्या खर्चाला काटछाट देण्यात आली आहे. यावर्षीचे शिलकीचा अर्थसंकल्प आहे. खर्चात कपात केली आहे. कोणतीही करवाढ केली नाही. शहराच्या विकासाच्या दृष्टीने अर्थसंकल्पात तरतुदी करण्यात आल्या आहेत.
>
> -अजिंक्य रणदिवे, मुख्याधिकारी

# उजनी धरणाचा जलसाठा निम्म्यावर, काटेकोरपणे नियोजन करणे अत्यावश्यक

## पुणे, अहिल्यानागरसह सोलापूर जिल्ह्यासाठी वरदायिनी असलेल्या उजनी धरणाचा जलसाठा निम्म्यावर आला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे, अहिल्यानागरसह सोलापूर जिल्ह्यासाठी वरदायिनी असलेल्या उजनी धरणाचा जलसाठा निम्म्यावर आला आहे. जसजशा उन्हाच्या झळा वाढू लागल्या आहेत, तशी सिंचन आणि पिण्याच्या पाण्याची गरज वाढू लागली आहे. उपसा सिंचन, उन्हाळी आवर्तन व पिण्याच्या पाण्यासाठी कालव्याच्या व भीमानदीपात्रातून भरमसाठ पाणी सोडण्यात येत आहे .परिणामी, उजनी धरण्याच्या उपलब्ध पाणीसाठ्यात कमालीची घट होत आहे. त्यामुळे उजनी जलाशयातील पाण्याचे तातडीने व काटेकोरपणे नियोजन करणे अत्यावश्यक आहे.

दरम्यान, दरवर्षी उन्हाळ्यात पाण्यासाठी शेतकरी, लोकप्रतिनिधी टाहो फोडतात, परंतु यश येत नाही. त्यामुळे या परिस्थितीला जबाबदार असलेली कालवा सल्लागार समिती नेमके करते काय? याप्रश्री शेतकरीवर्ग सध्या आक्रमक आहे. यावर्षी पावसाळ्यात समाधानकारक पाऊस झाल्याने धरण पूर्ण क्षमतेने भरले होते. त्यामुळे जिरायती भागासह बागायती क्षेत्रातील शेतकरी सुखावला होता.

गेल्या वर्षी दुष्काळाच्या झळा सोसणारा शेतकरीवर्ग सध्यातरी समाधानी आहे. परंतु जानेवारी व फेब्रुवारी महिन्यात उजनी धरणाच्या पाणी पातळीत कमालीची घट झाली आहे. उन्हाळा सुरू होण्यापूर्वीच पाणीसाठा पन्नास टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. या परिस्थितीमुळे ऐन उन्हाळ्यात उजनीच्या पाण्याचा उन्हाळा होण्यास उशीर लागणार नाही, अशा प्रकारची चिंता उजनी पाणलोट क्षेत्रातील शेतकऱ्यांना वाटत आहे.

सोलापूर शहरासाठी भीमा नदीपात्रातून साडेपाच ते सहा टीएमसी पाणी सोडण्यात येते. पण यामधील केवळ अर्धा टीएमसी पाणी दोन बंधाऱ्यात साठले जाते. सोलापूर शहरासाठी समांतर जलवाहिनीचे काम पूर्ण होऊ न योजना कार्यान्वित झाल्यास भीमा नदी पात्रातून पाणी सोडणे बंद होईल, त्यामुळे पाण्याचा अपव्यय कमी होऊन भविष्यात शेतीच्या पाण्यासाठी जास्त उपलब्धता होऊ शकते. जसजशा उन्हाच्या झळा वाढू लागल्या आहेत, तशी सिंचन आणि पिण्याच्या पाण्याची गरज वाढू लागली आहे गेल्या वर्षी दुष्काळाच्या झळा सोसणारा शेतकरीवर्ग सध्यातरी समाधानी आहे. परंतु जानेवारी व फेब्रुवारी महिन्यात उजनी धरणाच्या पाणी पातळीत कमालीची घट झाली आहे.



### मुख्य आकडेवारी

- » पाण्याची पातळी*: ४९४.२७० मीटर (आर डब्ल्यू एल)
- » पाण्याचा पसरण क्षेत्र*: २६८.०० चौरस किलोमीटर
- » विशाल साठा*: २५४९.२० दशलक्ष घनमीटर (९०.०१ टीएमसी)
- » जिवंत साठा*: ७४६.३९ दशलक्ष घनमीटर (२६.३६ टीएमसी)
- » जिवंत साठा टक्केवारी*: ४९.२०%

> दौंड तालुक्यातील भीमा नदीची पाणीपातळी झपाट्याने कमी होत असल्याने उजनी धरणग्रस्त शेतकरी चिंताग्रस्त आहे. उपसा सिंचन, कालवा सिंचन तसेच पिण्याच्या पाण्याचे योग्य व फेरनियोजन करणे गरजेचे आहे. याप्रश्री दौंड ,इंदापूर,कर्जत व करमाळा तालुक्यातील लोक प्रतिनिधींनी लक्ष दिले पाहिजे.
>
> - भालचंद्र तुकाराम चव्हाण, ज्येष्ठ शेतकरी, मलठण,तालुका दौंड